# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४१९५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
तार : EDUTECH E-mail : desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/न.अ./२००६/ ९३५० 13 एप्रिल 2007

Vidya Bharati Mahavidyalaya
AMRAVATI
Inward No. 25
21 APR 2007
To whom

प्रति,
प्राचार्य,
विद्या भारती शैक्षणिक मंडळाचे,
विद्या भारती इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च,
अॅण्ड रिसर्च अॅण्ड पी.जी.स्टडिज इन
सायन्स अॅण्ड मॅनेजमेंट
अमरावती-४४४ ६०२.

विषय : शैक्षणिक वर्ष २००६-२००७ पासून विना-अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,क्रमांक-पीसीआय-२००६/(३१६/०६)/तांशि-१, दिनांक २९.०६.२००६.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून विना-अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये नवीन पदवी अभ्यासक्रम खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | एमसीए | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये उपरोक्त नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सन २००६-०७ पासुन विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजुरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.
२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-टिईएम ३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१ अ, दिनांक २१ मे, १९८३ अन्वये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.
३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावे. शिक्षक व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.
४. संस्थेने अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये नवीन पदवी अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून रु.३.५० लाख देना बँक शाखा कॅम्प अमरावती, येथे पावती क्र.५५८५४४३, दि.०८.०७.२००६ अन्वये संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत.

C:\Degree order 2006-07\MCA add Eng. doc.yele.

आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाची फी निर्धारित करण्यासाठी शिक्षण शुल्क समिती यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर अभ्यासक्रमाचे शिक्षण शिक्षणशुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे आकारण्यात यावे. निर्धारीत केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त फी आकारू नये.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके इत्यादी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व मा.कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपुर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

९. या संचालनालयाने किंवा मा.कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा मा.कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

११. संस्थेला मा.कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१२. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २००६-०७ साठी प्रवेश नियमात विहीत केलेल्या तरतुदीनुसार केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यात येतील.

१३. विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही, तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१४. शासनाने, या संचालनालयाने मा.कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

**उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.**

(प्रा.न.दा.पारसनीकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत:
१. मा.प्रधान, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना माहितीस्तव सादर.
३. मा.कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. श्री.एन.बी.पाटील, सिस्टिम ॲनालिस्ट यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.